# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ / फाल्गुन २०, १९४६ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

-----------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

-----------------------------------------------

### मीरा-भाईंदर महानगरपालिकेंतर्गतच्या आरएनए लिबर्टी गृह संकुलातील इमारतींचा विनापरवाना वाणिज्य वापर करण्यात येत असल्याबाबत

**(१)** * **२४५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरएनए लिबर्टी गृह संकुलाच्या मीरा भाईंदर महानगरपालिका नकाशात इमारत १ व २ चा विकास भोगवटा पत्र सन २००९ नुसार रहिवाशी वापराकरिता केलेला असतानाही, सदर इमारतीचा विनापरवाना वाणिज्य वापर होत असून सदर इमारतीच्या विकासकाचे निधन झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासक हयात नसतानाही त्याच्या नावाने इमारतीतील बंद गाळे/दुकाने अज्ञात इसमाकडून विक्रीला काढून महानगरपालिकेचा कर बुडविला असून स्थानिक संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर इमारतीचा वाणिज्य वापर होत असल्याने त्याबाबत अनेक वेळा शासनाकडे पाठपुरावादेखील करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार शासनाने सदर प्रकल्पाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मीरा भाईंदर महानगरपालिकेचा कर बुडविल्याप्रकरणी संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे पेणकरपाडा येथील सर्व्हे क्र. २२५ (जुना) ५७ (नवीन) या जागेवर आरएनए लिबर्टी गृह संकुलाच्या इमारत क्र. जी-२८ (तळ+८), डी-२६ (तळ+मजला), एच-२९ (तळ+८), अे-२५ (तळ + ८) या इमारतींचे मंजूरीनुसार बांधकाम पूर्ण झाल्याने,

त्यांस दिनांक २९/०६/२००७ रोजी भोगवटा दाखला देण्यात आलेला आहे.

सदर भोगवटा प्राप्त इमारतींमधील तळ मजला येथील मंजूरीनुसार रहिवास वापराऐवजी विना परवानगी वाणिज्य वापर सुरू आहे, ही वस्तुस्थिती आहे.

महानगरपालिकेने दिलेल्या विकास परवानगीनुसार विकासक हे श्री.अनिल अग्रवाल आहेत. त्यांच्या निधनाच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे अभिलेख तपासले असता, त्यामध्ये अनिल अग्रवाल या नावाच्या वेगवेगळे एकूण ४ व्यक्तींच्या मृत्यूची नोंद असल्याने त्यापैकी नेमके विकासक कोणते आहेत याचा सद्य:स्थितीत बोध होत नाही.

(२) मौजे पेणकरपाडा येथील जागेवरील आरएनए लिबर्टी या इमारतीमधील बंद गाळे/दुकाने विकासक हयात नसतानाही अज्ञात इसमाकडून विक्रीले गेल्याची बाब सह दुय्यम निबंधक वर्ग-२, ठाणे कार्यालयात आढळून येत नाही.

उक्त इमारतींमध्ये मालमत्ता कर आकारणीनुसार एकूण १६३ निवासी मालमत्ता आहेत. त्यापैकी २६ मालमत्ता धारक बिगर निवासी वापर करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्याकडून वाणिज्य वापरानुसार बिगर निवासी कर वसूल करण्यात येत आहे.

आतापर्यंत बिगर निवासी वापर करणाऱ्या २६ मालमत्ता धारकांपैकी १५ मालमत्ता धारकांकडून २०२४-२५ या वर्षाचा कर भरणा करून घेण्यात आला असून, उर्वरित ११ मालमत्ता धारकांकडून बिगर निवासी दराप्रमाणे कर वसूली करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चर्चगेट (मुंबई) येथील एच.आर.महाविद्यालयाने अग्निसुरक्षेच्या मागदर्शक तत्वांचे पालन न केल्याबाबत

**(२) * १८४ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चर्चगेट (मुंबई) येथील एच. आर. महाविद्यालयाकडून अग्निसुरक्षा नियमांचे पालन करण्यात अक्षम्य दिरंगाई करण्यात आली असल्याने या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, तसेच सहाय्यक आयुक्त, 'ए' विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या दिनांक २ ऑगस्ट, २०२४ रोजी निदर्शनास आणून देखील त्यांच्याकडून सदर प्रकरणी आजमितिस कोणतीही दखल घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागाने शाळा आणि महाविद्यालयांनी अग्निसुरक्षेसंबंधी करावयाच्या उपाययोजनेसंदर्भात दिनांक ५ ऑगस्ट, २००४ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वांचे पालन संबंधित महाविद्यालयाकडून करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अग्निसुरक्षेसंदर्भातील उपाययोजना करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या एच. आर. महाविद्यालय व्यवस्थापनावर कठोर कारवाई करण्याऐवजी हजारो विद्यार्थी/कर्मचाऱ्यांच्या जीविताशी खेळणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यात महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतूदीनुसार अग्निसुरक्षाविषयक बाबी हाताळण्यात येतात.

मा.लोकप्रतिनिधी यांच्याकडून दिनांक ०४/०८/२०२४ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने एच.आर. महाविद्यालय आस्थापना इमारतीची दिनांक १६/०८/२०२४ रोजी व दिनांक २३/१२/२०२४ रोजी बृहन्मुंबई अग्निशमन दलाकडून स्थळपाहणी करण्यात आली. यात सदर इमारतीतील अग्निसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित असल्याचे आढळून आले.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) नगरपंचायतीचे तत्कालीन मुख्याधिकारी व लेखापाल यांनी माझी वसुंधरा अभियानांतर्गत अनियमितता केल्याबाबत

**(३)** * **९०६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) नगरपंचायतीचे तत्कालीन मुख्याधिकारी व लेखापाल यांनी संगनमताने माझी वसुंधरा अभियानांतर्गत अनियमितता केली असून दोषींवर कठोर कारवाई होणेकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वृक्ष लागवड कामाची त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करून त्यांचेकडून रक्कम वसूल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे प्राप्त दिनांक १३/०१/२०२५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने, सदर प्रकरणी विभागाच्या दिनांक २४/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांचा अहवाल मागविण्यात आला आहे.

दरम्यान, याच विषयाबाबत मा.लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, जळगाव यांना पाठविलेल्या दिनांक १३/०१/२०२५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्याकरीता प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव, तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी, मुक्ताईनगर, जि.जळगाव यांना तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांच्या दिनांक २४/०२/२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरातील गाळयांचे भाडे विकासकांनी थकविल्याबाबत

**(४) * ३२२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या जमिनीवरील इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी १६ खाजगी विकासकांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे संक्रमण शिबीरातील शेकडो गाळे भाडेतत्वावर घेतले असून त्याचे सुमारे रुपये २०० कोटी एवढ्या रकमेचे भाडे थकविले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकासकांना म्हाडाने नोटीशी बजावून १५ दिवसांच्या आत भाडे भरण्याच्या सूचना दिल्या असून भाडे न भरल्यास खोल्या जप्त करण्यात येतील असे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती व कोणत्या विकासकांनी म्हाडाकडे भाडे जमा केले आहे तसेच किती विकासकांनी भाडे रक्कम जमा केलेली नाही तसेच सदर भाड्याची रक्कम किती आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भाडे जमा न करणाऱ्या विकासकांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच थकीत भाड्याची रक्कम विकासकाकडून वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) दिनांक ०१ एप्रिल, २०१६ ते माहे जानेवारी, २०२५ पर्यंत एकूण रुपये २७४.३८ कोटी थकीत भाड्याची वसूली करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत माहे जानेवारी, २०२५ अखेर रक्कम रुपये १७२.५४ कोटी + त्यावरील विलंब आकार रुपये ११९.८४ कोटी असे एकूण रुपये २९२.३८ कोटी थकीत आहे.

(४) वि.नि.नि ३३(७) अंतर्गत थकबाकी अदा न करणाऱ्या एकूण १४ विकासक व एस.आर.ए. अंतर्गत वि.नि.नि. ३३(१०) अंतर्गत एकूण १४ पैकी ६ विकासक यांना काम थांबवा नोटीस (Stop Work Notice) देण्यात आली आहे. १२ विकासक संक्रमण गाळयांपोटी थकीत भाडे भरणा करीत नाहीत तोपर्यंत सदर विकासक यांना इतर परवानग्या देण्यात येऊ नये, असे मुख्य कार्यकारी अधिकारी / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविण्यात आले आहे.

संक्रमण गाळ्याच्या भाड्यापोटी थकीत रकमेचा भरणा न करुन शासनाचे आर्थिक नुकसान केल्यामुळे २२ थकबाकीदार विकासक यांचे विरुध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे दिनांक ०९/०२/२०२१ अन्वये तक्रार दाखल केली आहे. २२ पैकी ६ विकासक यांच्याविरुध्द खेरवाडी पोलीस स्टेशन येथे मंडळा मार्फत जबाब नोंदविण्यात आले आहेत.

संक्रमण गाळयांच्या भाड्याची थकबाकी असणाऱ्या विकासकांविरुध्द म्हाडा अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुषंगाने विकासक यांची जंगम व स्थावर मालमत्ताबाबतचा तपशिल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी/मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर यांना कळविण्यात आले आहे. तसेच विकासकाची बँक खाती गोठविण्याच्या दृष्टीने विकासकांच्या

बँक खात्यांचा तपशिल सुध्दा मागविण्यात आला आहे.

थकबाकी विहीत मुदतीत न भरल्याने विकासकांविरुध्द दुवपु मंडळामार्फत दिनांक २१/०२/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अक्कलकोट नगरपरिषदेने तीर्थक्षेत्र विकासासाठीची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(५) * ५८९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट निवासी वटवृक्ष श्री.स्वामी समर्थ मंदिर परिसरात तीर्थक्षेत्र विकासासाठी प्रलंबित भूसंपादन अक्कलकोट नगरपरिषदेने हाती घेतल्याने स्वामी समर्थ मंदिर परिसर सुसज्ज होणार असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे परंतु, मंदिर परिसरासह तेथील रस्ते अरुंद असून, इतर आवश्यक पायाभूत सोयीसुविधांच्या अभावाचा विचार करून भूसंपादनाची प्रक्रिया जलदगतीने सुरू व्हावी यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे तसेच सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, याअनुषंगाने शासनाने अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास कामांच्या विकास आराखड्यास पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

अक्कलकोट नगरपरिषद विकास योजना सन-२०११ मध्ये मंजूर झाली आहे. आरक्षण क्र.४१ हे श्री.वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर विकास यासाठी आरक्षीत असून सदर जागेची विकास योजनेनुसार अधिग्रहण संस्था ही श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान आहे. विकास योजना अंमलात येऊन १० वर्ष कालावधी पूर्ण झालेला असून सुद्धा अद्याप ही आरक्षित जमिनीचे भूसंपादन झालेली नसल्याने व भविष्यात सदरचे आरक्षण व्यपगत होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये अधिग्रहण संस्था अक्कलकोट नगरपरिषद करण्याबाबत नगरपरिषदेने दिनांक ३०/०१/२०२५ रोजी ठराव पारीत केला आहे. सदर आरक्षण फेरबदलाच्या प्रस्तावाबाबतची छाननी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावर सुरु असून शासनास अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींचा विचार करुन उचित कार्यवाही करण्यात येईल.

(२) प्रस्तावित आराखड्यामध्ये एकूण-९ रस्ते विकसित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून ४ रस्त्यांची कामे सद्य:स्थितीत सुरु झालेली आहेत. उर्वरीत रस्त्यांच्या भूसंपादनासाठी व विकास कामांसाठी नगरपरिषदेकडून सुधारीत विकास आराखडा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०५/२०२३ रोजी आयोजित केलेल्या शिखर समितीच्या बैठकीत समितीने रुपये ३६८.७१ कोटी इतक्या रक्कमेचा अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे तासगाव (ता.जि.सातारा) येथील साकव पुलाच्या बांधकामाची चौकशी करणेबाबत

**(६) * २९२ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तासगाव (मुळीकवाडी) (ता.जि.सातारा) या गावाचा आदर्श पंतप्रधान योजनेत समावेश असून, या गावाच्या तयार विकास आराखड्यानुसार गावाच्या मागासवर्गीय वस्तीमध्ये साकव पूल बांधण्याचा प्रस्ताव ग्रामपंचायतीने ग्रामसभा ठरावाव्दारे मंजूर करुन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांचेकडे सन २०२० मध्ये सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियोजित साकव पुलाचे ठिकाण बदलून, ज्या ठिकाणी सदर पूल बांधण्यात येणार आहे त्याठिकाणी यापूर्वीच ब्रिटीशांनी बांधलेल्या मुख्य पुलाच्या बांधकामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याकडून लेखापरीक्षण न करताच सदरील ब्रिटिशकालीन मुख्य पूल पाडून त्याचठिकाणी सदरचा साकव पूल बांधण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनुसार मौजे तासगाव (ता.जि.सातारा) येथील नियोजित जरीआई ओढयावरील साकव पुलाचे बांधकाम हे जरीआई मंदीराशेजारील ओढयावर होणे अपेक्षित असताना त्याठिकाणी झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील कामास झालेला खर्च रक्कम रुपये १०.०० लक्ष (दहा लाख फक्त) बांधकाम विभागाने शासन खाती जमा करावे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी ग्रामपंचायत विभागातील व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांनी बांधकाम विभागातील संबंधितांवर कारवाई करावी असे जिल्हाधिकारी, सातारा यांनी आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली तसेच ग्रामपंचायतीने सुचविलेल्या ठिकाणी साकव पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) मौजे तासगाव येथे जरीआई ओढ्यावर साकव पूल बांधणे हे काम जिल्हा नियोजन समिती विशेष घटक योजना सन २०२०-२१ अंतर्गत मंजूर करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही. मौजे तासगांव, ता.जि.सातारा येथील जरीआई ओढ्यावर साकव बांधकाम हे सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी व सरपंच, ग्रामपंचायत तासगांव, ता.जि.सातारा यांनी कामाची स्थळ पाहणी

करुन त्यांनी दर्शविलेल्या ठिकाणी तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनुसार नियोजित ठिकाणी करण्यात आले आहे.
(४) व (५) मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे यांचेकडून सदर कामाबाबत अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार कार्यवाही करणेचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांदिवली (मुंबई) येथील झोपडपट्टीधारकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(७) * ७९३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जानुपाडा व पांडे कंपाऊंड, कांदिवली पूर्व (मुंबई) येथील २५०० झोपड्यांमध्ये अंदाजे १० हजार नागरिक गत ३० ते ३५ वर्षांपासून वास्तव्यास असून या ठिकाणच्या ७०० हून अधिक झोपडपट्टीधारकांकडे वीज कनेक्शन तर १००० हून अधिक झोपडीधारकांना पाणी मीटर नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून अधिकृतरित्या पाणी व वीजेसारख्या मूलभूत सुविधांचा पुरवठा होत नसल्याने स्थानिक माफियांकडून येथील नागरिकांची मूलभूत सोयीसाठी मोठ्या प्रमाणात लूट होत असून पाणी व वीज चोरीच्या घटना देखील या भागात वाढत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर झोपडपट्टीधारकांना सुरळीत पाणीपुरवठा व वीज यांसारख्या मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/दक्षिण विभाग क्षेत्रातील कांदिवली (पूर्व) येथील जानुपाडा, पांडे कंपाऊड येथे विजेचा पुरवठा मे. टाटा पॉवर व मे. अदानी इलेक्ट्रिसिटी या खाजगी पुरवठादाराद्वारे करण्यात येतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकाद्वारे जानुपाडा व पांडे कंपाऊंड, कांदिवली पूर्व येथे मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र.३०५/१९९५ बाबत मा.न्यायालयाने दिनांक ०७/०५/१९९७ रोजी दिलेल्या आदेशापुर्वी पाणी पुरवठ्याकरीता १२४ अधिकृत जल जोडण्या उपलब्ध करुन दिल्या होत्या. तथापि, मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वन विभागाद्वारे वन जमिनीवरील लोकवस्त्यांना विज जोडणी तथा जल जोडणी देण्यास परवानगी देण्यात येत नसल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे अधिकृत जलजोडण्या देण्यात आलेल्या नाहीत.
(२) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे अनधिकृत जलजोडणीबाबत तक्रार प्राप्त झाल्यास जोडणी खंडित करण्याबाबतची कारवाई करण्यात येते. विज पुरवठा करणाऱ्या कंपन्यामार्फत अनधिकृत विज जोडण्यांमुळे संभाव्य सार्वजनिक व मालमत्तेची हानी होण्याची शक्यता लक्षात घेता प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येते.

(३) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ३०५/१९९५ अंतर्गत दिनांक ०७/०५/१९९७ रोजी दिलेल्या आदेशानुसार वन विभागाच्या जमिनीवरील लोकवस्त्यांना कोणत्याही नविन वीजजोडणी/ जलजोडणी देण्यास वन खात्याकडून परवानगी दिली जात नसल्यामुळे या भागात कोणतीही नवीन जलजोडणी बृहन्मुंबई महानगरपालिकेला देणे शक्य होत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे ते नाशिक या शहरांदरम्यानच्या औद्योगिक महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(८) * ३८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे ते नाशिक या शहरांदरम्यान औद्योगिक महामार्ग तयार करण्याच्या घोषणेनुसार भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली असून सदर महामार्गाच्या भूसंपादनास जुन्नर परिसरातून विरोध झाल्यामुळे भूसंपादन प्रक्रिया थांबविण्यात आली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गामुळे सिन्नर, संगमनेर, मंचर, नारायणगाव, चाकण परिसरात पायाभूत सुविधा विकासास गती मिळणार असल्याने या महामार्गासाठी भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून महामार्गाच्या कामास सुरुवात करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी तसेच या परिसरातील विविध उद्योजकांच्या संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे ते नाशिक औद्योगिक महामार्गाचे भूसंपादन तसेच प्रस्तावित कामे जलदगतीने होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पुणे नाशिक औद्योगिक महामार्गाच्या भूसंपादनास झालेला विरोध विचारात घेता पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी संपादीत करण्यात येत असलेल्या जमिनीतूनच प्रस्तावित महामार्गाची आखणी करता येईल किंवा कसे, याबाबत पडताळणी करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नगरपरिषद व महानगरपालिका शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे खाते सुरू करणेबाबत

**(९) * ३३८ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषद व महानगरपालिकेतील शाळांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे खाते (NPS) सुरू करण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे खाते (NPS) उघडून त्यांना खाते क्रमांक तसेच PRAN क्रमांक देणे आवश्यक होते, तथापि, असे खाते उघडले न गेल्यामुळे त्यांना वेतनात देय असलेला शासनाचा १४% हिस्सा व कर्मचाऱ्यांच्या वेतनातील १०% हिस्सा त्यांच्या खात्यात जमा होत नसल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयाप्रमाणे नगरपरिषद व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे खाते उघडून त्यांना खाते क्रमांक तसेच PRAN क्रमांक देण्याबाबत व त्यानुषंगाने त्यांना वेतनात देय असलेला शासनाचा १४% हिस्सा व कर्मचाऱ्यांच्या वेतनातील १०% हिस्सा त्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील महानगरपालिकांमध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासंदर्भात नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.११९/नवि-२०, दिनांक २२/०२/२०२२ निर्गमित करण्यात आला आहे.

नगरपरिषदा / नगरपंचायतीमध्ये नगरपरिषद, नगरपंचायतीमधील राज्यस्तरीय संवर्गाव्यतिरिक्त अधिकारी / कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्यासंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(२) या अनुषंगाने राज्यातील काही महानगरपालिकांमध्ये कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) राज्यातील महानगरपालिकांमध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२१/प्र.क्र.११९/नवि-२०, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ अन्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने राज्यातील काही महानगरपालिकेमध्ये त्यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

त्याच धर्तीवर नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये नगरपरिषद, नगरपंचायतीमधील राज्यस्तरीय संवर्गाव्यतिरिक्त अधिकारी / कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागु करण्यासंदर्भात कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत नगरपरिषदा, नगरपंचायती यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

-----------------

## मुंबईतील कामाठीपुरा परिसराच्या पुनर्विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाबाबत

**(१०)** * **७४ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा परिसराचा समुह पुनर्विकासाद्वारे कायापालट करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून (म्हाडा) राबविला जात असलेला प्रकल्प सर्व प्रक्रिया पूर्ण करीत निविदा काढण्याचे ठरविल्यानंतर, सदर पुनर्विकास प्रकल्प म्हाडाऐवजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्याचा शासनाच्या नगरविकास विभागाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाठीपुरा पुनर्विकासासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती, रहिवाशांची छाननी, प्रस्तावित आराखडा, वेगवेगळया भूखंड मालकांची चर्चा आदी अनेक प्राथमिक बाबी म्हाडाने केलेल्या असताना अचानक म्हाडाची करण्यात आलेली नियुक्ती रद्द करुन त्याऐवजी बृहन्मुंबई महानगरपालिकेची नियुक्ती करण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कामाठीपुरा समूह पुनर्विकासाचा प्रकल्प पूर्ण होण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) ही बाब खरी नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उध्दवत नाही.

-----------------

## राज्यातील सहा नदी जोड प्रकल्प पूर्णत्वास नेण्याबाबत

**(११)** * **१००० श्री.अंबादास दानवे, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा कमी पावसाचा विभाग असल्याने दर एक-दोन वर्षांनी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत असून गावे-वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा लागत असून शासनाने राज्यातील महत्वाकांक्षी सहा नदी जोड प्रकल्पास तांत्रिक मान्यता दिली असून सदरहू प्रकल्पांचे काम संथगतीने सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकणामध्ये प्रत्येकी किती एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे तसेच सदर प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक निधी उपलब्धता व कालमर्यादा निश्चित केली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे मराठवाड्यातील दुष्काळमुक्ती आणि शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित होण्यास मोठी मदत होईल, यातून मराठवाड्यातील शेती, उद्योग, सिंचनाची समस्या दूर होऊन आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजा पूर्ण होण्यास मदत होईल, शिवाय रोजगाराच्या नवीन संधीही निर्माण होतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हा प्रकल्प मराठवाड्याच्या विकासासाठी वरदान ठरणारा असून त्याची अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागामार्फत खालील चार नदी जोड प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प- सदर प्रकल्पास शासन निर्णय दिनांक २०/०८/२०२४ नुसार रुपये ८७३४२.८६ कोटी किंमतीस तत्वत: व सर्वेक्षण, अन्वेषणाकरीता रुपये १२३२.०६ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या सर्वेक्षण, अन्वेषणाकरीता दिनांक १३/०१/२०२५ रोजी अभिकरणास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

दमणगंगा - एकदरे - गोदावरी नदीजोड प्रकल्प - पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातील पाणी पुर्वे कडील गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी दमणगंगा - एकदरे - गोदावरी, प्रकल्पास शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२४ नुसार रुपये २२१३.५३ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण(MWRRA)मान्यता, पर्यावरण मान्यता, वन जमीन मान्यता ई. वैधानिक मान्यता नोव्हेंबर-२०२५ अखेर घेण्याचे नियोजन असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

दमणगंगा - वैतरणा - गोदावरी नदीजोड प्रकल्प - पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातील पाणी पुर्वे कडील गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी दमणगंगा - वैतरणा - गोदावरी, प्रकल्पास शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२४ नुसार रुपये १३४९७.२४ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) मान्यता, पर्यावरण मान्यता, वन जमीन मान्यता ई. वैधानिक मान्यता नोव्हेंबर-२०२५ अखेर घेण्याचे नियोजन असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

नार पार गिरणा नदीजोड प्रकल्प - नार पार गिरणा नदी जोड योजना गिरणा खोऱ्यासाठी प्रस्तावित असून सदर योजनेस शासन निर्णय दिनांक ०५/०९/२०२४ अन्वये रुपये ७४६५.२९ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सद्य:स्थितीत रक्कम रुपये ४६६०.७२ कोटी किंमतीची निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

तसेच पश्चिम वाहिनी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्याकरीता खालील योजना प्रस्तावित आहेत :-

पश्चिम वाहिनी वैतरणा व उल्हास खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळवणेबाबत या योजनेंतर्गत वैतरणा खोऱ्यातील ३४.८० टीएमसी पाणी व उल्हास खोऱ्यातील १९.९० टीएमसी असे एकूण ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात मराठवाड्यासाठी वळविण्याचे प्रस्तावित आहे.

योजनेचा सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण करण्यासाठी रुपये ६१.५२ कोटी किंमतीस शासन निर्णय दिनांक ०५/०९/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षणाच्या कामाचे आदेश अभिकरणास दिनांक ०३/०१/२०२५ अन्वये देण्यात आले असून सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

पार-गोदावरी नदीजोड प्रकल्प- या योजनेसाठी ३.०२ टीएमसी पाणी वापर प्रस्तावित होता.तथापि, सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाकरीता १.४२ टीएमसी ची तुट आहे.

तथापि, प्रस्तावित पार-तापी-नर्मदा प्रकल्प रद्द झाल्याने या योजनेतून उपलब्ध होत असलेल्या पाण्याचा पार गोदावरी योजनेकरीता अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने तलांकनिहाय मर्यादा न ठेवता अभ्यास करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) होय.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भातील ३७१२७७ हे. (९१७४२५ एकर) क्षेत्र सिंचनाखाली प्रस्तावित आहे.

सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण व प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता २ वर्ष तसेच बांधकामाकरीता ८ वर्ष असा एकूण १० वर्षाचा कालावधी नियोजीत आहे.

दमणगंगा - एकदरे - गोदावरी- या प्रकल्पाद्वारे नाशिक जिल्ह्यातील २९८७ हे. (७३२१ एकर) नविन सिंचन क्षेत्र निर्माण होणार असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९७६६ हे. (२४१३२ एकर) सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे.

प्रकल्पाच्या कामाची निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार प्रकल्प ५ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

दमणगंगा - वैतरणा - गोदावरी या प्रकल्पाद्वारे नाशिक जिल्ह्यातील २१९८० हे. (५४३१३ एकर) व पालघर जिल्ह्यातील ५२९० हे. (१३०७२ एकर) नविन सिंचन क्षेत्र निर्माण होणार असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ५८४० हे. (१४४३१ एकर) सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे.

प्रकल्पाच्या कामाची निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार प्रकल्प ७ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

दिनांक ०७/०२/२०२५ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत नागपुर येथे झालेल्या बैठकीत Asian Infrastructure Investment Bank (AIIB) यांनी दमणगंगा - एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्पास अर्थसहाय्य करण्याची तयारी दर्शवली आहे.

नार पार गिरणा नदी जोड या योजनेद्वारे नाशिक जिल्ह्यातील ३२४९२ हेक्टर (८०२८९ एकर) व जळगांव जिल्ह्यातील १७०२४ हेक्टर (४२०६७ एकर) असे एकूण ४९५१६ हे. (१२२३५४ एकर) क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

उपरोक्त दोन्ही प्रकल्पांच्या कामाची निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार प्रकल्प ७ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) होय.

दमणगंगा - एकदरे - गोदावरी व दमणगंगा - वैतरणा - गोदावरी या दोन नदीजोड प्रकल्पांमधून एकूण ९.२३ टीएमसी पाण्यापैकी ४.४३ टीएमसी पाणी मराठवाड्यासाठी वळविणे प्रस्तावित आहे.

पश्चिम वाहिनी वैतरणा व उल्हास खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळवणेबाबत या योजनेंतर्गत वैतरणा खोऱ्यातील ३४.८० टीएमसी पाणी व उल्हास खोऱ्यातील १९.९० टीएमसी असे एकूण ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात मराठवाड्यासाठी वळविण्याचे प्रस्तावित आहे.

या सर्व योजनांमुळे मराठवाड्यातील दुष्काळमुक्ती व शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित होण्यास मदत होणार आहे. तसेच यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

(४) मुद्या क्र. १ प्रमाणे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेकडून श्वान नसबंदी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१२) * ३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत भटक्या श्वानांची वाढती संख्या व त्यांच्या हल्ल्यांमुळे भितीचे वातावरण निर्माण झाले असून श्वानांची संख्या आटोक्यात आणण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून तीन वर्षांपासून बंद असलेली भटक्या श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया पुन्हा सुरू केली असली तरी देखील भटक्या श्वानांची संख्या शहरात कमी झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२४ ते माहे नोव्हेंबर, २०२४ पर्यंत ठाणे महानगरपालिका हद्दीत भटक्या श्वानांनी सुमारे १३ हजार ९० लोकांवर हल्ला केला असून त्यातील १२०० घटनांमध्ये नागरिकांना गंभीर दुखापत झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे शहरातील भटक्या श्वानांना आवर घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

कोरोना महामारीच्या कालावधीत भटक्या श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया बंद होती. तथापि, भटक्या श्वानांची वाढती संख्या व भटक्या श्वानांच्या हल्ल्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) ठाणे महानगरपालिका हद्दीत केंद्र शासनाच्या पशुजन्य नियंत्रण नियम (श्वान) २००१ अन्वये भटक्या श्वानांच्या नसबंदीचा कार्यक्रम व रेबीज प्रतिबंध लस देण्याचा कार्यक्रम सन २००४ पासून राबविण्यात येत असून सन २००४ ते माहे जानेवारी,२०२५ पर्यंत ७१,०६४ भटक्या श्वानांवर प्रजनन प्रतिबंध शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.सदरील श्वान नसबंदी कार्यक्रम सातत्याने सुरु आहे.तसेच पकडलेल्या प्रत्येक श्वानास रेबीज प्रतिबंध लस दिली जाते.

ठाणे महानगरपालिका व प्राणी मित्र संस्था यांचेमार्फत रेबीज लसीकरण मोहीम "रेबीज मुक्त ठाणे" कार्यक्रम गेल्या २ वर्षापासून राबविण्यात येत आहे.

Animal Welfare Board Of India यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मनुष्य प्राणी संघर्ष टाळण्याकरीता व नसबंदी शस्त्रक्रियेचे प्रमाण वाढविण्यासाठी विविध उपाययोजना अंमलात येत आहेत. याअंतर्गत भटके श्वान दत्तक योजनेसह प्रोत्साहन देणे, शालेय मुलांची व गृहसंकुलांमध्ये नागरिकांची जागरुकता वाढविणे इ. कार्यक्रम करण्यात येतात.

केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार नागरिकांकरीता श्वानदंशाची लस व औषधोपचार मोफत देणेबाबत प्रभावी उपाययोजना राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गव्हाणपाडा (मुलुंड) येथील सावित्री को.ऑप सोसायटीतील रहिवाशांना विकासकाने थकीत घरभाडे, वाढीव जागेचे पैसे अदा केले नसल्याबाबत

**(१३)** * **६६१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील मुलुंड (पुर्व) गव्हाणपाडा येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या सावित्री को.ऑप हाऊसिंग सोसायटीतील अनेक रहिवाशांना मेसर्स एस्सार कस्ट्रक्शन कंपनीचे विकासक अमित पांगम यांनी घरभाडे, वाढीव जागेचे पैसे दिले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी वारंवार यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) विभाग, बांद्रा व विकासक यांच्याकडे पाठपुरावा करुनही उक्त देणी देण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सोसायटीमध्ये आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेले सभासद राहत असून सन २०१८ मध्ये सदनिकेचा ताबा घेतला असून आज सहा वर्षांचा कालावधी होऊनही रहिवाशांचे घरभाडे, वाढीव जागेचे पैसे विकासकाने थकविले असून रहिवाशांना व्याजासहित घरभाडे व वाढीव जागेचे पैसे अदा करण्याबाबत तसेच विकासकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

योजनेमधील काही सभासदांचे सन २०१८ ला सदनिकेचा ताबा मिळण्यापूर्वीचे काही भाडे थकीत असल्याचे दिनांक २०/०९/२०२४ रोजीच्या तक्रारीवरुन निदर्शनास आले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी थकीत भाडे निश्चित करण्याकरीता लेखापरीक्षक यांची नेमणूक केली असता,त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार थकीत भाड्याबाबत संस्थेकडून कोणताही तपशिल अथवा पुरावा प्राप्त झालेला नसून संस्थेच्या म्हणण्यानुसार काही सभासदांना भाडे मिळालेले नसून अंदाजे १२ लक्ष रुपये एवढे भाडे थकीत आहे. परंतु त्याबाबतचा तपशिल प्राप्त नसल्याने भाडे निश्चिती करता आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राज्य शासनाच्या विविध विभागांनी करांच्या थकित रकमेचा भरणा करण्याबाबत

**(१४)** * **१६८ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेला प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या खर्चापोटी शासनाकडून सहायक अनुदान प्राप्त होत असून, शिक्षणाच्या खर्चासाठी सहायक अनुदान, पाणीपट्टी आणि मालमत्ता कर शासनाच्या विविध विभागांनी गतवर्षात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भरला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सहायक अनुदान, पाणीपट्टी आणि मालमत्ता कराचा भरणा शासनाच्या विविध विभागांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

डिसेंबर, २०२४ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या खर्चाकरीता सहाय्यक अनुदान याकरीता रुपये ६५८१.०८ कोटी, मालमत्ता कर व तत्सम आकार याकरीता रुपये १५७६.९७ कोटी व मलनि:सारण आकार व जल आकारापोटी रुपये ७८०.१५ कोटी अशी एकूण रुपये ८९३८.२० कोटी इतकी रक्कम राज्य शासनाच्या विविध विभाग व त्याअंतर्गतची कार्यालय यांच्याकडून येणे बाकी आहे.

(२) थकीत रकमेचा भरणा करण्याबाबत नगरविकास विभागाच्या स्तरावर दिनांक १३/०९/२०२३, दिनांक १५/०९/२०२३ व दिनांक १८/०९/२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत देण्यात आलेल्या सूचनेनुसार, दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंतची थकित रक्कम अदा करण्याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या स्वाक्षरीने संबंधितांना दिनांक १२/१२/२०२३ व दिनांक २२/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. याबाबत महानगरपालिकेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिडकोने आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटासाठी जाहीर केलेल्या घरांच्या किंमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याबाबत

**(१५) * ४३९ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने निर्माणाधीन ६७ हजार घरांपैकी विविध नोडमधील २६ हजार घरांच्या किंमती ऑनलाईन अर्ज नोंदणीला दोन दिवस शिल्लक असताना मंगळवार, दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास सोशल मीडियावर जाहीर केल्या असून यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटासाठी जाहीर केलेल्या घरांच्या किंमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किंमत जास्त असल्याने घरे न घेऊ शकणाऱ्या पण अर्ज केलेल्या अर्जदारांची अनामत रक्कम सिडको अर्जदारांना परत करणार असून तसेच सर्वसामान्यांना परवडतील अशा घरांची निर्मिती व विक्री करण्याबाबत सिडको प्रशासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घरांच्या किंमती नोडनिहाय रुपये २५ लाखांपासून ते ९७ लाखांपर्यंत असल्याने आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या नसल्याने त्यांच्यामध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सिडकोच्या घरांच्या किंमती सर्वसामान्य नागरिकांना परवडतील अशा निर्धारित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, जाहिरात प्रसिध्द करतेवेळीच घरांच्या किंमती जाहीर न केल्यामुळे व तद्नंतर त्या जाहीर केल्यामुळे सिडकोच्या घर विक्रीसंदर्भात जनतेत संभ्रम निर्माण होऊन सिडको घर विक्रीवर परिणाम झाल्यामुळे सदर प्रक्रियेस विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) सिडकोने जाहीर केलेल्या गृहनिर्माण योजनेतील घरांच्या किंमती दिनांक ७/०१/२०२५ रोजी जाहीर केलेल्या आहेत. या योजनेतील घरांच्या किंमती ह्या बाजारभाव, सिडकोचे किंमत निश्चितीचे धोरण व सर्वसामान्यांची आर्थिक क्षमता लक्षात घेऊन निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

या योजनेतील २५,७२३ घरांसाठी २१,३९९ अर्जदारांनी अनामत रक्कम भरली असून त्यापैकी १९,५१८ अर्जदारांना सोडतीमध्ये घरे वाटप करण्यात आली आहेत. ज्या अर्जदारांना त्यांच्या पसंतीक्रमांकानुसार सदनिका सोडतीमध्ये मिळाल्या नाहीत, त्यांनी स्वेच्छेने सदनिका परत केल्यास, त्यांची अनामत रक्कम परत करण्यात येईल.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरात साथीच्या आजाराचे स्वतंत्र रुग्णालय उभारण्याबाबत

**(१६) * १४६ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात साथीच्या आजारासाठी असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयाच्या धर्तीवर मुंबई उपनगरात देखील अशा पध्दतीचे साथीच्या आजारासाठी स्वतंत्र रुग्णालय उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साथीच्या आजारासाठी मुंबई उपनगरात एकही स्वतंत्र रुग्णालय उपलब्ध नसल्याने उपनगरातील रुग्णांना उपचारासाठी मुंबईला यावे लागत असून रुग्णांना अनेक अडचणींचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साथीच्या आजाराच्या रुग्णांचा कस्तुरबा रुग्णालयावर येत असलेला अधिकचा ताण दूर करण्यासाठी मुंबई उपनगरात साथीच्या आजाराचे स्वतंत्र रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सद्य:स्थितीत मुंबई शहरात साथीच्या आजारासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयात उपचार केले जातात. मुंबई उपनगरीय रुग्णालयात साथीच्या रोगांचे निदान झाल्यानंतर रुग्णांना उपनगरीय रुग्णालयात विलगीकरण करण्याची सोय उपलब्ध आहे. साथीच्या रोगाने अति गंभीर रुग्णांना कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज उपसा जलसिंचन योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१७) * २२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील २२ गावांतील शेतीला सिंचनाचा लाभ व्हावा या उद्देशाने कार्यान्वित करण्यात आलेल्या गुरुकुंज उपसा जलसिंचन योजनेंतर्गत शेतात पाईपलाईन टाकण्यात आल्या परंतु, नियोजनाचा अभाव, संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष व पाईपलाईन अनेक ठिकाणी लिकेज असल्यामुळे पाणीपुरवठा बंद करण्यात आल्यामुळे रब्बीतील पिकांचे नुकसान झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या हितासाठी अल्पावधीतच कोटयवधी रुपये खर्चून तयार केलेल्या या योजनेमुळे सुमारे १८ हजार एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन शेतकऱ्यांच्या पिकांना पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

गुरुकुंज उपसा सिंचन योजना ही उर्ध्व वर्धा प्रकल्पाचा भाग असून सा.क्र. ४३ किमी वरुन पाण्याची उचल करण्यात येते. यामुळे उर्ध्व वर्धा धरणाच्या सिंचन नियोजनानुसार योजनेचे सिंचनाचे नियोजन करण्यात येते. या बाबतची जाहीर सूचना दिनांक ०६/११/२०२४ रोजी लाभक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीद्वारे प्रसिध्द करण्यात आली आहे. दिनांक २९/११/२०२४ रोजी उर्ध्वगामी नलिकेत गळती आढळल्याने दुरुस्तीकरीता पंपगृह बंद ठेवण्यात येवून दिनांक १०/१२/२०२४ पासून दुरुस्ती करुन योजना परत कार्यान्वित करण्यात आली आहे. अद्यापपर्यंत जलसंपदा विभागाच्या कुठल्याही कार्यालयास रब्बी पिकाचे नुकसान झाल्याबाबत लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

योजनेचे ओलीताखाली येणारे क्षेत्र (ICA) ७१०९ हे. म्हणजेच १७५५९ एकर इतके आहे.

(३) रब्बी हंगाम २०२५ जाहीर सुचनेनुसार एकही पाणी मागणीपत्र प्राप्त झाले नव्हते. तथापि, दिनांक २६/११/२०२४ रोजी योजना कार्यान्वित करण्यात आली होती. दिनांक २९/११/२०२४ रोजी उर्ध्वगामी नलिकेला गळती आढळल्याने योजनेचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला होता व विभागाकडून युध्द स्तरावर कार्यवाही करुन दिनांक १०/१२/२०२४ पासून योजनेचा पाणीपुरवठा पुर्ववत सुरु करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत जाहीर सुचनेनुसार ४ पाळ्या पूर्ण झालेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहाची दुरुस्ती करणेबाबत

**(१८) * २२६ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांच्या नवीन वसतिगृहांची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने वसतिगृहाची दुरवस्था लपविण्यासाठी बाहेरून पडदा लावला आहे तसेच तुटलेल्या खिड्क्या लाकडांनी झाकल्या असून डॉक्टर विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पदव्युत्तर पदवीच्या नवीन वसतिगृहाच्या इमारतींची अनेक वर्षांपासून डागडुजी तसेच स्वच्छताही झाली नसून खिडक्या,मुख्य दरवाजासह इतर दरवाजेही तुटले असून वसतिगृहाच्या आवारात मातीचे ढीग साचले असून अशा स्थितीमध्ये डॉक्टरांना राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसतिगृहाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच वसतिगृहाच्या दुरवस्थेस कारणीभूत असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही

(२) व (३) हे खरे नाही

वसतिगृहाच्या संरक्षण भिंतीचे काम चालू असल्यामुळे सुरक्षा पुरक बॅरेकेटींग लावण्यात आली होती. तसेच खिडक्या सुस्थितीत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांना औषधांचा पुरवठा करणाऱ्या वितरकांची देयके थकित असल्याबाबत

**(१९) * ५०७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांसह विविध रुग्णालयात औषधांचा पुरवठा करणाऱ्या वितरकांची सुमारे रुपये १२० कोटींची देयके महानगरपालिकेने मागील चार महिन्यांपासून थकविल्यामुळे औषध वितरकांना आर्थिक संकटांशी सामना करावा लागत असून सदर देयके तातडीने मंजूर न झाल्यास औषधांचा पुरवठा बंद करण्याचा इशारा वितरकांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिला असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने औषध पुरवठा करणाऱ्या १५० कंत्राटदारांचे १२० कोटी रुपये थकविल्याने कंत्राटदारांनी दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारापासून केईएम,शीव, नायर रुग्णालयांसह सुमारे ७ रुग्णांलयात औषध पुरवठा बंद केला असून उपचारार्थ येत असलेल्या सर्वसामान्य रुग्णांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वितरकांनी औषधांचा पुरवठा बंद करण्याचा इशारा दिल्यामुळे महानगरपालिका रुग्णालयांत औषधांचा तुटवडा निर्माण होणार असून याचा त्रास सर्वसामान्य रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देता यावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून औषध पुरवठादार यांना दि १४/०२/२०२५ पर्यंत २० कोटी रुपयाचे अधिदान करण्यात आले असून उर्वरित साधारण १ कोटी रुपयाचे अधिदान करण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्य:स्थितीत सदर पुरवठादारांकडून औषध पुरवठा सुरळीतपणे सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाच्या विविध कार्यालयांचे कामकाज कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत असल्याबाबत

**(२०) * १०८९ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय भरतीवर मर्यादा असल्याने शासनामार्फत विविध कार्यालयातील कामकाज हे कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांकडून करुन घेतले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका कार्यालयात १६००, विद्यापीठ विभागात ५९१, जिल्हा परिषदेत-१७०, घाटी विभागात-१४३, जिल्हाधिकारी कार्यालयात २० व सिडको प्रशासनात ९८ इतके कर्मचारी असून त्यामध्ये १५० पदे ही कंत्राटी स्वरुपात भरण्यात आली असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा कंत्राटी तत्वावर नेमलेल्या कर्मचाऱ्यांना नोकरी नसलेली हमी व तुटपुंजे मानधन यामुळे आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता असून अशा कंत्राटी तत्वावरील नेमलेल्या कर्मचाऱ्यांकडे आर्थिक व्यवहाराची जबाबदारी देण्यात येवु नये असे शासन आदेश असताना तशी जबाबदारी देणाऱ्या शासकीय / निमशासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) हे खरे नाही.

मात्र संबंधित विभागांकडून प्राप्त माहितीच्या अनुसार काही प्रमाणात कर्मचारी बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यात आलेले आहेत.
(३) व (४) सद्य:स्थितीत संबंधित विभागांकडून प्राप्त माहितीनुसार संस्थेमार्फत बाह्ययंत्रणेने नेमण्यात आलेले कर्मचारी यांचेकडे आर्थिक व्यवहाराची जबाबदारी सोपविण्यात येत नाही.

-----------------

## छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेमार्फत (सारथी) देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण शुल्काबाबत

**(२१) * ११२० श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेमार्फत (सारथी) आर्थिकदृष्ट्या दुर्बल मराठा विद्यार्थ्यांना शासनाकडून आर्थिक साहाय्य दिले जाते, त्यानुसार खासगी शिक्षण संस्थेचे संपूर्ण प्रशिक्षण शुल्क 'सारथी'कडून देण्यात येते परंतु या योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यामध्ये अनियमितता झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सारथीकडून नेमलेल्या अधिकाऱ्यांनी शिकवणीवर्गाची योग्य पडताळणी केली नसून सारथीने शासकीय स्पर्धा परिक्षांसाठी १२ खासगी शिकवणीवर्गांना नियुक्त केले होते, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची ७५ टक्क्यांची अट पूर्ण करण्यासाठी खासगी शिकवणीवर्गाने एका विद्यार्थ्याच्या नावावर २ 'बायोमेट्रिक आयडी' मुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची बनावट नोंद दाखवून अनुदानाचा गैरवापर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सारथीमार्फत नेमलेल्या अधिकाऱ्यांनी कोचिंग क्लासेसची योग्य तपासणी केली नसल्याची बाब निदर्शनास आली असून सदर अनियमिततेप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक ३०/१०/२०२३ अनुसार स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण पूर्व कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण उपसमिती यांच्यामार्फत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्गांची निवड करण्यात आली आहे.

सारथी संस्थेकडून एकूण सहा प्रशिक्षण उपक्रमांपैकी माहे जानेवारी-२०२५ मध्ये फक्त १) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (न्यायिक सेवा) प्रशिक्षण उपक्रम व २) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (अभियांत्रिकी सेवा-स्थापत्य,यांत्रिकी व विद्युत) हे दोन प्रशिक्षण उपक्रम सुरु झाले आहेत.

माहे जानेवारी महिन्यात युपीएससी, एमपीएससी, कर्मचारी निवड आयोगाच्या अराजपत्रित पदांच्या परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण, NABARD, IBPS व इतर बँकिंग परीक्षा हे उपक्रम व त्यामध्ये समाविष्ट असलेले विद्यार्थी यांच्या प्रशिक्षणास सुरुवात झालेली नाही. त्यामुळे खाजगी शिकवणी वर्गाने एका विद्यार्थ्याच्या नावावर दोन बायोमेट्रिक आय.डी. करुन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची बनावट नोंद दाखवून अनुदानाचा गैरवापर करण्यात आला आहे हे खरे नाही. तसेच त्यासंदर्भात प्रशिक्षण वर्ग शुल्क वा इतर बाबींची अदायगी सारथीमार्फत अद्याप झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील रहिवाशांकडून दंडात्मक शुल्क आकारण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत

**(२२) * ११८६ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) ५६ वसाहतीतील संक्रमण शिबिरात सुमारे ९० हजार रहिवाशांकडून रुपये ३००० एवढी रक्कम दंडात्मक शुल्क आकारण्याचा निर्णय म्हाडा प्राधिकरणाने घेतला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी संक्रमण शिबिरातील सदनिकांची विक्री, नावातील बदल नियमित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदनिकांची विक्री, नावातील बदल नियमानुकूल केले असल्यामुळे दंडात्मक शुल्क आकारण्यात येऊ नये अशी मागणी लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) व शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) ५६ वसाहतीतील संक्रमण शिबिरातील रहिवाशांकडून दंडात्मक शुल्क आकारला जाऊ नये यादृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

म्हाडातंर्गत संक्रमण शिबिरामध्ये सुमारे २०४९३ संक्रमण गाळे असून, म्हाडा प्राधिकरणाच्या धोरणानुसार मूळ भाडेकरुंना मासिक सेवाशुल्क रुपये ५००/- व संक्रमण शिबिरात अनधिकृत वास्तव्य करणाऱ्या सर्व घुसखोर/अपात्र रहिवाश्यांकडून दिनांक ०१/०४/२०१० पासून रुपये ३०००/- मासिक सेवाशुल्क आकारण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१४/प्र.क्र.१०२ (भाग-१)/दुवपु-२, दिनांक १३/०९/२०१९ अन्वये म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील अधिकृत, अपात्र, अनाधिकृत भाडेकरु/रहिवाशी यांचे पुनर्विकसीत करण्याच्या दृष्टीने अ,ब व क प्रवर्ग करण्यात आलेले आहेत.

शासनाचे दिनांक १३/०९/२०१९ च्या आदेशाविरुध्द श्री.यावर हुसेन गुलाम हुसेल ओमाटीया यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ०१/२०२० दाखल केली असून, मा.उच्च न्यायालयाने उक्त शासन निर्णयावर स्थगिती दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर आणि उपनगरातील घनकचरा व्यवस्थापन निवारणार्थ कृती आराखडा तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबत

**(२३) * १७२८ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात दररोज सुमारे ६५०० मेट्रिक टन घनकचरा विविध माध्यमांतून जमा करण्यात येतो त्यापैकी फक्त ३० टक्के कचऱ्याची योग्य पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दररोज जमा झालेला घनकचरा कांजूर व देवनार येथील क्षमता संपत असलेल्या कचराभूमीवर पाठवून डंम्पींग केला जात असून सद्य:स्थितीत तेथील कचराभूमीवर मोठे ढीग तयार होऊन तेथील कचरा विघटन पध्दतीच्या आगीमुळे शहर व लगतच्या भागात मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होऊन मुंबईकरांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत देवनार येथे कचऱ्यापासून वीज निर्मितीचा एकच प्रकल्प कार्यान्वित असून शहरातील वाढत्या घनकचरा व्यवस्थापन करण्याकरीता अधिक क्षमता असलेले नवीन प्रक्रिया प्लांट कार्यान्वित करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरातील स्वच्छता अभियानांकरीता विविध गृहनिर्माण सहकारी संस्था तसेच रुग्णालयांकरीता कचरा पुनर्वापर प्रोत्साहन योजना अंतर्भुत असलेला घनकचरा विल्हेवाट कृती आराखड्याची अंमलबजावणी महानगरपालिकेमार्फत करण्यास दिरंगाई होत असून आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त मुंबई शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने तसेच शहराचे विद्रुपीकरण टाळण्याकरीता व कचऱ्याची विल्हेवाट संदर्भातील समस्यांचे कायमस्वरुपी निवारण करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मुंबईतील एकूण दररोज स्विकारण्यात येणाऱ्या ६५०० मेट्रीक टन कचऱ्यापैकी साधारण ५९०० मेट्रीक टन (म्हणजेच साधारण ९०% कचऱ्यावर) कांजूर घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे बायोरिॲक्टर लॅण्डफिल (BLF) या शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यात येते. उर्वरीत साधारण ६०० मेट्रीक टन कचरा जनहित याचिका क्र.२१७/२००९ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये स्थापन केलेल्या संनियंत्रण समितीच्या नियंत्रणाखाली देवनार क्षेपणभुमी येथे पाठविण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

(३) देवनार येथे ६०० मेट्रीक टन प्रतिदिन क्षमतेचा कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत असून तो ऑक्टोबर, २०२५ पर्यंत कार्यान्वित होत आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दैनंदिन रस्त्याची साफसफाई तसेच गृहनिर्माण संस्थाकडून निर्माण होणारा कचरा वेगवेगळया टप्प्यातून क्षेपणभूमी पर्यंत नेला जातो. त्यातील सुका कचरा वर्गीकरण केंद्रामध्ये वर्गीकृत करुन त्यातील पुनर्वापराकरीता उपयुक्त कचरा पुढे पुनर्वापर केंद्रांवर पाठविण्यात येतो. पुनर्वापराकरीता प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळया माध्यामातून जनजागृती करुन नागरीकांना प्रेरीत केले जाते. तसेच, पुनर्वापराच्या अनुषंगाने ओला-सुका कचरा वर्गीकरण करत असणाऱ्या गृहनिर्माण सहकारी संस्थाना त्यांच्या मालमत्ता कर देयकातील साधारण कर या घटकामध्ये ५ टक्के पर्यंतची सुट तसेच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करित असल्यास अतिरिक्त ५% सुट देण्यात येते.

शहराचे विद्रूपीकरण टाळण्याचे दृष्टीने कचरा मुक्त तास, धुळनियंत्रण फवारणी इत्यादी वेगवेगळया संकल्पना राबविल्या जातात. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता क्षेपणभूमीवर बायोकंपोस्टींग, बायोमेथेनेशन अशा प्रकारच्या वैज्ञानिक प्रकीया करून उरलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्सोवा – भाईंदर या किनारपट्टी मार्गाच्या कामाची नियमबाह्य कंत्राटे दिल्याबाबत

**(२४) * १७६ श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेल्या वर्सोवा – भाईंदर या २३.४८ किलोमीटर लांबीच्या आणि २२ हजार कोटी रुपयांच्या किनारपट्टी मार्गाच्या कामासाठी आवश्यक परवानगी आणि जमीन उपलब्ध नसतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने चार कंपनीच्या ठेकेदारांना शासनाची परवानगी न घेता सदर मार्गाच्या कामांची कंत्राटे दिली असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा प्रक्रिया पूर्ण करताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने या कंपन्यांना रुपये २२ हजार १६६ कोटींच्या कामाचे कार्यादेश तसेच एकत्रिकरण (मोबिलायझेशन) अग्रिमही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वर्सोवा – भाईंदर या किनारपट्टी मार्गाच्या कामाची नियमबाह्य कंत्राटे देणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतील संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबईमध्ये किनारी रस्ता विकसित करण्याकरीता नियुक्त केलेल्या संयुक्त तांत्रिक समितीच्या शिफारशीनुसार वर्सोवा ते दहिसर व पुढे दहिसर ते भाईंदर दरम्यान रुपये २२ हजार १६६ कोटी इतक्या किंमतीचा प्रकल्प सात पॅकेजेस मध्ये विभागलेला (Design and Build) या तत्वावर प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे हाती घेण्यात आला. या प्रकल्पाकरीता ४ कंत्राटदारांना निविदेची विहित प्रक्रिया पार पाडून टप्पानिहाय कामांकरीता कार्यादेश देण्यात आले आहे.

निविदेतील तरतूदीनुसार या संपूर्ण प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या/ना-हरकत प्राप्त करण्याची एकत्रित जबाबदारी पॅकेज A चे काम देण्यात आलेले कंत्राटदार मे.ऍपको इन्फ्राटेक प्रा. लि. यांना देण्यात आली आहे. यांनी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड व पर्यावरण वन मंत्रालय व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून परवानगी प्राप्त करुन घेण्यात आली आहे. तसेच, वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत वन वळतीकरणाच्या प्रस्तावास (forest diversion proposal) मान्यता मिळाली असून वन हक्क अधिनियम अंतर्गत पर्यायी वनीकरणाबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्प मार्गरेषेने बाधित होणारी बहुतांश जमीन ही खाडी, कांदळवने व इतर नैसर्गिक क्षेत्रांमधून जाते. हे क्षेत्र प्रकल्पाच्या एकूण बाधित जमिनीपैकी अंदाजे ७०% असून शासकीय मालकीचे असल्याने भुसंपादन करण्याची आवश्यकता नाही. उर्वरित अंदाजित ३०% जागा ही बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच खाजगी मालकीची असून, खाजगी जागेच्या भुसंपादनाची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रगतिपथावर आहे.
(२) हे खरे आहे.

या प्रकल्पाकरीता विहित निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करुन कंत्राटदारांना टप्पानिहाय कामांकरीता कार्यादेश देण्यात आले आहेत. निविदेच्या तरतुदीनुसार कंत्राटदारांना प्रकल्प किमतीच्या १० टक्के इतकी रक्कम दोन हप्त्यांमध्ये ६ टक्के व्याजदराने अनुज्ञेय आहे. याकरीता कंत्राटदाराने मागणी केलेल्या रकमेच्या ११० टक्के रकमे इतके बँक हमीपत्र महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे.

यानुसार कंत्राटदारांनी केलेल्या मागणीनुसार मे.ऍपको इन्फ्राटेक प्रा. लि. यांना पॅकेज-A & F करीता व मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड यांना पॅकेज-E व पॅकेज-DBLR करीता प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात आगाऊ रक्कमेचे (Mobilization Advance) अधिदान करण्यात आलेले आहे. याव्यतिरिक्त सदर प्रकल्पामधील इतर कोणत्याही कंत्राटदारांनी आगाऊ रक्कमेची मागणी केलेली नाही. या कंत्राटदारांना दिलेल्या आगाऊ रक्कमेची व्याजासहित वसूली या कामापोटी देण्यात येणाऱ्या धावत्या देयकामधुन (Running Account Bills) करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर ते अजिंठा रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२५) * ९२५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजिंठा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे ऐतिहासिक बौध्दकालीन लेणी असून या लेणी पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे येत असतात परंतु, छत्रपती संभाजीनगर ते अजिंठा या रस्त्यांची मागील दहा वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाल्याने येथे येणाऱ्या पर्यटक तसेच परिसरातील प्रवाशांना वाहतुकीच्या अडचणींना सामोरे जावे लागत असून तेथील रस्त्यांच्या झालेल्या दुरवस्थेमुळे अपघात होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजिंठा (जि.छत्रपती संभाजीनगर) हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने येथील रस्त्यांचे काम पूर्ण होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच उक्त रस्त्याची दुरुस्तीस विलंब करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अंशत: खरे आहे,

जळगांव-अजिंठा-छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे-मानगावं-दिघी पोर्ट हा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३-F असून तो राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम) विभागाकडे देखभाल दुरुस्तीसाठी आहे. या राष्ट्रीय महामार्गाची एकूण लांबी १४७.३८ कि.मी. आहे.

सन २०२० ते २०२५ या पाच वर्षाचे दरम्यान तीन अपघात झाल्याची नोंद गृह विभागाकडून उपलब्ध झालेली आहे.

(२) व (३) माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये छत्रपती संभाजीनगर ते जळगांव या रस्त्याच्या दुपदरीकरणाच्या कामास तीन विविध टप्प्यात विभागून मंजूरी देण्यात आली. तद्नंतर केंद्र शासनाकडून या रस्त्याचे दुपदरीकरणा ऐवजी रस्त्याच्या उपलब्ध असलेल्या रुंदीमध्ये (ROW) कमीत कमी भूसंपादन करण्याच्या अटीस अधीन राहून चौपदरीकरण करण्याचे आदेशित करण्यात आले. सदर मंजूरीस साधारणत: दोन वर्षाचा विलंब झाला. सदर कालावधीत मूळ कंत्राटदाराच्या कामाची प्रगती कमी असल्याने निविदा तरतूदीनुसार Tripartiate agreement करुन उपकंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली. सद्य:स्थितीत छत्रपती संभाजीनगर ते अजिंठा या एकूण ९९.६६ कि.मी. लांबीपैकी ९२.१२७ क.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित लांबीतील काम माहे मार्च-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

दुपदरीकरणाऐवजी चौपदरीकरण करण्याचा झालेला निर्णय व त्यास अनुसरुन अतिरिक्त भूसंपादनास झालेला विलंब, स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध तसेच सन २०२० ते २०२१ या कालावधीमध्ये आलेल्या कोरोना महामारीमुळे रस्त्याचे काम पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे.

-----------------

## मुंब्रा-कळवा (जि.ठाणे) भागातील पाण्याची चोरी थांबविण्याबाबत

**(२६) * ३०८ श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा-कळवा (जि.ठाणे) या भागातील नागरिकांसाठी असलेल्या पाण्याची चोरी टँकर माफिया आणि महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पाणी चोरी थांबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे तसेच ठाणे महानगरपालिका प्रशासनातील सदर पाणी चोरी प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मनोरी (मुंबई) येथे नि:क्षारीकरण प्रकल्प उभारण्याबाबत

**(२७) * १८९४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला तानसा, मोडक सागर, मध्य वैतरणा, उर्ध्व वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या तलावातून दररोज ३८५० लीटर दशलक्ष लीटर पाण्याचा पुरवठा करण्यात येत असून सन २०४१ पर्यंत मुंबई शहराची पाण्याची प्रतिदिन गरज ही ६४२६ दशलक्ष लीटर असल्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभ्यास अहवालातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईची पाण्याची वाढती गरज भागविण्याकरीता समुद्राचे खारे पाणी गोड करण्यासाठी मनोरी (मुंबई) येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत्त नि:क्षारीकरण प्रकल्प उभारण्यात येणार असून याकरीता राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेला अल्प प्रतिसाद मिळाल्याने ही निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत प्रामुख्याने उद्भवलेल्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सदरहू प्रकरणी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून या प्रकल्पास गती देण्याबाबत मा.केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनास माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून सदर प्रकल्पाला गती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रतिदिन ४००० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तज्ञ समितीच्या अहवालानुसार, सन २०४१ च्या अंदाजित लोकसंख्येनुसार पाण्याची मागणी प्रतिदिन ६४२४ दशलक्ष लिटर इतकी दर्शवली आहे.

(२) हे खरे आहे.

नि:क्षारीकरण प्रकल्पाच्या उभारणीकरीता दिनांक ०४/१२/२०२३, दिनांक ११/०३/२०२४ व दिनांक ०६/०८/२०२४ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, अल्प प्रतिसादामुळे या निविदा रद्द करण्यात आल्या.

(३) व (४) हे खरे नाही.

मा.केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री यांच्याकडून सदर प्रकल्पासंबंधी बृहन्मुंबई महानगरपालिकेस निर्देश प्राप्त झालेले नाहीत.

या प्रकरणी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेस अत्यल्प प्रतिसाद प्राप्त झाल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. तसेच, सदर निविदेचा अभ्यास करण्यासाठी व निविदेस प्रतिसाद वाढावा यासाठी आवश्यक बदल सुचविण्याकरीता त्रयस्थ सल्लागार म्हणून मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स (M/s. TCE) यांची दिनांक ७/१०/२०२४ रोजी नेमणूक करण्यात आली असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिकमधील विकासक २० टक्के योजनेंतर्गत म्हाडाच्या हिश्शातील घरे आणि भूखंड देण्यास विरोध करित असल्याबाबत

**(२८) * ७७ श्री.विक्रांत पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वसामान्यांना खाजगी विकासकाच्या प्रकल्पात परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध व्हावीत यासाठी शासनाने अंमलात आणलेल्या २० टक्के योजनेंतर्गत नाशिकमधील विकासकाने म्हाडाच्या हिश्शातील घरे आणि भूखंड देण्यास विरोध करित असून सुमारे पाच हजार घरे म्हाडाला अद्यापही प्राप्त झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी म्हाडाने नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने नाशिकमधील विकासकामार्फत म्हाडाच्या हिश्श्यातील २० टक्के घरे आणि भूखंड म्हाडाला उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) म्हाडा प्राधिकरणाने याबाबत दिनांक ०२/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये नगरविकास विभागास कळविले आहे.
(३) नगरविकास विभागाकडून संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व नाशिक महानगरपालिका यांचेकडून अहवाल प्राप्त करुन पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शालेय पोषण आहाराकरीता राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२९) * १५३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सन २०२४ ते २०२७ पर्यंत मुंबईतील शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचा शालेय पोषण आहार मिळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये पात्र नसलेल्या तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने काळया यादीत समावेश केलेल्या संस्थांना कंत्राट देवून कार्यारंभ आदेश देण्यात आल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतलेल्या निविदाकारांनी अटी व शर्तीनुसार अनुभवाबाबतची खोटी कागदपत्रे सादर करण्यात आल्याच्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पोषण आहाराची कामे देण्यात आलेल्या संस्थांकडे स्वत:चे उपहारगृह नसून एका उपहारगृहामध्ये चार-पाच संस्थेची कामे सुरु असून महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याशी आर्थिक संगनमत करुन एका व्यक्तीने वेगवेगळया संस्था स्थापन करुन पोषण आहाराची कामे मिळविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने फेर निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत तसेच शासनाची फसवणूक करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द गुन्हा दाखल करुन त्याचा समावेश काळया यादीत करण्याबाबत व बृहन्मुबई महानगरपालिकेच्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करुन त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

मे.स्वयंसिध्दी विकासीनी महिला सेवा सहकारी संस्था व जाई महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था या दोन संस्थांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून काळ्या यादीत समावेश करण्यात आला होता.तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुधारीत धोरणानुसार स्वारस्याची अभिव्यक्ती महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडर प्रणालीवर मागविण्यात आली. या प्रणालीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने काळया यादीत टाकलेल्या संस्था / कंपनी यांना निविदा भरण्याकरीता प्रतिबंध

करण्याकरीता प्रणाली नसल्याने सर्व संस्थांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी पूर्णत: त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार करण्यात आली असल्याने, तसेच संस्थांनी कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे शपथपत्र सादर केल्याने काळ्या यादीतील २ संस्था पात्र ठरल्या.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतलेल्या निविदाकारांच्या स्वयंपाकगृहाची व गोदामांची प्रत्यक्ष पाहणी (Kitchen visit) व त्यानुसार गुणांकन करण्यात आलेले असून त्यानुसार प्राप्त गुणांकन यादीनुसार निविदेची पुढील कार्यवाही करण्यात आली आहे.

एकाच स्वयंपाकगृहातून चार-पाच संस्थांचे कामकाज चालू असल्याचे आढळून आलेले नाही.

(४) या प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार खोटी कागदपत्रे सादर केलेल्या व प्रक्रीयेदरम्यान काळया यादीत नाव असलेल्या एकूण ४ संस्थांची नियुक्ती तात्काळ रद्द करुन दिनांक ०१/०२/२०२५ पासून त्यांच्या जागी प्रतिक्षा यादीतील संस्थांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत विनापरवाना जाहिरात फलक बसविण्यात येत असल्याबाबत

**(३०) * १४५२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथील होर्डिंग कोसळून १७ निष्पापांचा बळी गेल्यानंतर प्रत्येक जाहिरात फलकासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी बंधनकारक केली असताना मुलुंड टोलनाक्यावर विनापरवाना होर्डिंग लावले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारितील उड्डाणपुलावरील होर्डिंगवर बृहन्मुंबई महानगरपालिकेची कारवाई सुरू असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) सदर होर्डिंग अधिकृत असल्याचे मत व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू होर्डिंग हे अधिकृत आहे की अनधिकृत याची तपासणी करण्यात आली आहे काय, तसेच एलईडी डिजीटल होर्डिंग वापरण्याकरीता शासनाने निकष अथवा कोणती मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारितील उड्डाणपुलावर असलेले अनधिकृत होर्डिंग हटविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुलुंड टोलनाक्यावरील दोन्ही जाहिरात फलक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने निविदा प्रक्रिया राबवून उभारले आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने उभारलेल्या जाहिरात फलकाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुज्ञापन खाते "टी" विभाग यांनी तपासणी केली असून याकरीता अधिनियमातील कलम ३२८ नुसार मान्यता घेण्यात आली नाही असे आढळून आले.

LED डिजीटल होर्डींगकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून उप आयुक्त (विशेष), भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई व सह पोलीस आयुक्त यांची समिती गठीत करण्यात आलेली असून नियम तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

(४) मुलुंड 'टी' विभाग हद्दीतील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) अखत्यारितील उड्डाणपुलावरील जाहिरात फलकावरील प्रदर्शित जाहीरातीचे निष्कासन करून मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ३२८ नुसार जाहिरात धारकावर न्यायालयीन दावे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाण्याच्या सीपी टँक डम्पिंगवर वर्गीकरणासाठी येणारा शेकडो टन कचरा उचलला नसल्याबाबत

**(३१)** * **१७० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सीपी टँक डम्पिंगवर वर्गीकरणासाठी येणारा शेकडो टन कचरा महिनाभरापासून उचलला नसल्याने कचऱ्यांचे ढीग तयार झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेकडो घंटागाड्यांच्या रांगा सीपी टँक परिसरात येत असल्याने परिसरातील नागरिकांना प्रचंड दुर्गंधीमुळे श्वसनाचा त्रास होत असूनही या डम्पिंगवर कचऱ्यांच्या वर्गीकरणाचे काम बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी कार्यान्वित असलेले मौजे डायघर येथील घनकचरा पूर्व प्रक्रिया केंद्र तांत्रिक अडचणीमुळे सद्य:स्थितीत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नाही. त्यामुळे सीपी तलाव येथील हस्तांतरण स्थानकात संकलित होणारा संपूर्ण घनकचरा प्रक्रियेसाठी घेऊन जाणे शक्य नसल्याने सीपी तलाव येथे काही प्रमाणात घनकचरा, स्थानकात साचून राहिला आहे.

(२) हे खरे नाही.

सीपी तलाव परिसरातील रस्ते अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून हस्तांतरण स्थानकात येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांसाठी प्रवेश व निर्गमन यासाठी वेगवगळे मार्ग तयार करण्यात

आलेले आहेत. तसेच वाहतुकीचे नियमन करण्यासाठी वाहतूक पोलीस व ट्रॅफिक वॉर्डनच्या मदतीने नियोजन करण्यात आलेले आहे.

सीपी तलाव परिसरात नियमितपणे दुर्गंधीनाशक व जंतूनाशकाची फवारणी करण्यात येत आहे.तसेच हस्तांतरण स्थानकात उच्च क्षमतेचे दुर्गंधीनाशक स्प्रेईंग मशीन कार्यान्वित करण्यात येऊन प्रभावी दुर्गंधी प्रतिबंधक उपाय योजना करण्यात येत आहेत.

सीपी तलाव हे हस्तांतरण स्थानक असून सदर ठिकाणी कचऱ्याचे वर्गीकरण होत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या मौजे विरार (बोळींज) येथील नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(३२) * १६२३ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या मौजे विरार (बोळींज) येथील व्हीपी /५ ३ ६ ७ (VP/५३६७) मोरेश्वर हाईटस, पाटील आळी या नियोजित इमारतीचे बांधकाम सन २०१९ पासून अपूर्ण असून रेरा कायद्यानुसार नियमानुसार इमारतीचे काम विहित वेळेत पूर्ण केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकाने इमारतीतील ६० रहिवाशांकडून सोसायटी स्थापन करण्यासाठी व इमारतीचा ताबा देण्यासाठी प्रत्येकी १,००,०००/- याप्रमाणे निधी जमा केला, परंतु अद्यापही सोसायटी स्थापन केली नाही तसेच घरपट्टी, पाणीपट्टी उदवाहनासाठी जनरेटर तसेच ओ.सी.यासारख्या बाबींची पूर्तता केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी विकासकांकडे विचारणा केली असता विकासकाने केलेल्या दुर्लक्षामुळे तेथील रहिवाशांनी माहे जानेवारी,२०२५ मध्ये बोळींज पोलीस स्टेशनमध्ये विकासकांविरुध्द तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत संबंधित नगररचनाकार, वास्तू विशारद व विकासक यांच्या संगनमताने इमारतीतील रहिवाशांसाठी प्रस्तावित असलेली मैदानाची व उद्यानाची मोकळी जागा परस्पर दुसऱ्या विकासकाला विकून त्यावर इमारतीचे बांधकाम सुरु झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी सदर इमारतीच्या परिसरातील उद्यानासाठी राखीव असलेल्या जागेवर इमारत बांधण्यास संबंधित नगररचनाकार व वास्तू विशारद यांनी नियमबाहयपणे परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, इमारतीच्या मैदानासाठी राखीव असलेल्या जागेवरील अवैध बांधकामास संबंधित नगररचनाकार व वास्तू विशारद यांनी महानगरपालिकेची परवानगी रोखण्याबाबत तसेच रहिवाशांना सदरील उद्यानाची मोकळी जागा पुन्हा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच अपूर्ण असलेले बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, खरे आहे,

मोरेश्वर हाईटस हा प्रकल्प पाटील असोशिएट्स या विकासकाने महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे (महारेरा) दिनांक २२/०८/२०१७ रोजी नोंदणी (नोंदणी क्रमांक पी ९९०००००९६६२) केलेला आहे. विकासकाने सदर प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ३०/१२/२०२१ असा निश्चित केला होता.सदर प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे तसेच महारेरा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रकल्पाची वेळोवेळी सद्यःस्थिती अद्ययावत न केल्यामुळे सदर विकासकाविरुध्द नोटीस बजावण्यात आल्या होत्या. तथापि, त्यास विकासकाने प्रतिसाद न दिल्याने महारेरा प्राधिकरणाने सदर प्रकल्प दिनांक १९/०३/२०२४ च्या आदेशान्वये आस्थगनत (Abeyance) केलेला आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाचे बँक खाते गोठविण्यात आले आहे. या प्रकल्पात आणखी घर खरेदी धारकांची फसवणूक होवू नये म्हणून प्रकल्पातील सदनिका/गाळे विक्रीस मनाई केलेली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

घरपट्टी, पाणीपट्टी आणि ओसी प्राप्त करणेसाठी विकासकाने स्वतंत्र प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तथापि, अशा स्वरुपाचा प्रस्ताव वसई विरार शहर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेला नाही.

(३) खरे आहे.

(४), (५) व (६) खरे नाही,

सदर भुखंड हा मंजूर विकास आराखड्यानुसार मैदान किंवा उदयान या आरक्षणाने बाधित नाही तसेच सदर आरक्षण प्रस्तावित नाही.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० (UDCPR) च्या कलम क्र/०३/४ च्या अनुसार ४००० चौ.मी. क्षेत्रा पेक्षा कमी असलेल्या प्रस्तावाला मनोरंजक मोकळी जागा (Recreational Garden) दयावयाची आवश्यकता नसते. सदर प्रस्तावाचे क्षेत्रफळ २५८० चौ.मी. असल्यामुळे सदर प्रस्तावास मोकळी जागा प्रस्तावित करण्याची आवश्यकता नाही. तरी सदर प्रस्तावातील आधीच दिनांक ०५/१०/२०१७ रोजीच्या सुधारीत बांधकाम परवानगी नुसार मंजूर मनोरंजक मोकळी जागा (Recreational Garden) चे क्षेत्र-२०१.८५ चौ.मी. असून दिनांक ०५/०२/२०२५ रोजीच्या नविनतम परवानगी मध्ये मनोरंजक मोकळी जागा २१४.६७ चौ.मी. पुर्नरचना करुन कायम ठेवण्यांत आलेली आहे.

सदर मिळकतीवर इमारती क्र.१ ला दिनांक ०७/०३/२०१५ तसेच दिनांक ०५/१०/२०१७ रोजी सुधारित बांधकाम परवानगी देण्यात आली होती. मे. पाटील असोशिएट चे भागीदार मोहनीश हरीहर पाटील व मे. केशव डेव्हलपर्स चे भागीदार राहुल पाटील यांनी एकत्रितपणे इमारत क्र. २ करीता सुधारित बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर केलेला असून सदर प्रस्तावास दिनांक ०५/०२/२०२५ रोजी सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे.

तथापि, सदर प्रकल्पास (इमारत क्र.१ बाबत) रेरा प्राधिकरणाने दिनांक १९/०३/२०२४ चे (Abeyance) चे आदेश विचारात घेता, वसई विरार शहर महानगरपालिकेने सदर प्रकल्पाची परिस्थिती महारेरा कायदयानुरूप होत नाही तोपर्यंत सदर प्रकल्पातील बांधकाम थांबविण्याचे आदेश (Stop work notice) दिनांक २८/०२/२०२५ रोजी दिले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणीसंग्रहालयासाठी प्रस्तावित केलेली विविध कामे पूर्ण करण्याबाबत

**(३३)** * **१८२३ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणीसंग्रहालयासाठी (राणीची बाग) प्रस्तावित केलेली कामे अत्यंत धिम्या गतीने सुरु असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने गतवर्षीच्या अर्थसंकल्पात सदर कामांसाठी केलेली आर्थिक तरतूद कागदोपत्री राहिल्याची बाब दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयाला दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक भेट देत असून उद्यान आणि प्राणिसंग्रहालयाला भेट देण्यासाठी येणारी लहान मुले, दिव्यांग आणि वृद्धांकरीता कोणत्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, सिंह, जग्वार, चित्ता, पाणघोडा, वॅलेबी, झेब्रा, जिराफ, मॅड्रिल मंकी, ओकापी, इमू, शहामृग, चिपांझी, लेसर फ्लेमिंगो, रिंगटेल लेमूर हे प्राणी, पक्षी सदर उद्यानात आणण्याच्या दृष्टीने त्यांच्यासाठी पिंजऱ्यांसह इतर पायाभूत सुविधा उभारण्याच्या सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राणीबाग परिसरालगत भूखंड शासनाने महानगरपालिकेला दिला असून या भूखंडावर परदेशातून प्राणी आणले जाणार असून राणीबागेचा हा विस्तार आकर्षक पध्दतीने केला जावा याकरीता निविदा काढण्याची परवानगी राणीबाग व्यवस्थापनाने महानगरपालिका प्रशासनाकडे मागितली आहे, तसेच प्राणी संग्रहालयाच्या दोन भूखंडावर विदेशी प्राण्यांचे प्रदर्शन तयार करण्याकरीता आजमितिपर्यंत निविदा मागविण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणीसंग्रहालयासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने गतवर्षीच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेली विविध कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या सन २०१२ मध्ये मंजूर केलेल्या व सन २०१९ मध्ये सुधारित केलेल्या बृहत आराखड्यानुसार वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालयाचा आधुनिकिकरणाचा प्रकल्प तीन टप्प्यांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे हाती घेण्यात आले आहे. पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्याची कामे सुरु आहेत. सदर कामांकरीता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये रुपये २१.४४ कोटी इतक्या रकमेची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली असून त्यापैकी रुपये १३.८९ कोटी इतकी रक्कम खर्च झालेली आहे. काही प्रस्तावित कामांच्या संरचनांमध्ये बदल झाल्यामुळे उर्वरित रक्कम रुपये ७.५४ कोटी इतकी खर्च न झाल्याने प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(२) वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती प्राणिसंग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी शितल व शुध्द पाणपोई, पुरुष व स्त्रियांसाठी स्वतंत्र १२ स्वछतागृह, २ उपहारगृह, १-बाळ संगोपन कक्ष, १-खुले प्रेक्षागृह, हरित निसर्ग मार्ग, खेळाचे मैदान इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तसेच प्राणिसंग्रहालयातील प्रत्येक प्राणीप्रदर्शनी सुविधा ही दिव्यांगांकरीता अनुकूल बनविण्यात आली असून दिव्यांग आणि वृद्धांकरीता चाकाची खुर्ची-१० तसेच ४- ई-वाहने यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, पर्यटकांसाठी ऑनलाईन तिकिट खरेदी सुविधा व स्वयंचलित तिकिट किऑस्क सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३), (४) व (५) गतवर्षीच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेली विविध कामे तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने काम प्रगतीपथावर असून, तिसऱ्या टप्प्यातील विदेशी प्राण्यांकरीता सुविधा प्रस्थापित करण्यासाठी प्राणीसंग्रहालय सल्लागार यांच्यामार्फत रेखाचित्रे, अंदाजपत्रके, मसुदा निविदा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुलुंड (मुंबई) येथील छत्रपती संभाजीराजे मैदानाला लागलेल्या आगीबाबत

**(३४) * ५१३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) येथील ऑक्सीजन पार्क म्हणून ओळखले जाणाऱ्या छत्रपती संभाजीराजे मैदानातील हिरवळीसाठी गत २० वर्षांपासून जोपासलेली मोठी झाडे आगीमध्ये जळून खाक झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे साठवलेल्या पालापाचोळयाच्या कचऱ्याला लागलेल्या आगीत ही झाडे नष्ट झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

मुलुंड (मुंबई) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या छत्रपती संभाजी राजे मैदानावर भारतीय प्रजातीच्या नव्याने लागवड करण्यात आलेल्या वृक्षांच्या बुंध्याभोवती आच्छादन (Mulching) म्हणून पसरविण्यात आलेल्या पालापाचोळयास दिनांक ०५ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी अल्प स्वरूपाची आग लागली. या आगीबाबत तात्काळ अग्निशमन दलास कळवून आग नियंत्रणात आणली. सदर आगीमध्ये २०२३-२०२४ मध्ये लावण्यात आलेली ७ रोपे अल्पशी होरपळली असून मैदानातील इतर कोणतीही झाडे जळून नष्ट झाली नाहीत.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत चौकशी करण्यात आली. यामध्ये सदर मैदानाचे परिरक्षण करण्यासाठी नेमलेल्या ठेकेदाराने सदर मैदानास पुरविण्यात येणाऱ्या सुरक्षेमध्ये निष्काळजीपणा केल्यामुळे ठेकेदारास रुपये १०,०००/- इतका दंड बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे आकारण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महारेराने राज्यातील १ हजार ९५० प्रकल्पांवर स्थगितीची कारवाई केल्याबाबत

**(३५) * ११२२ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महारेराने राज्यातील १ हजार ९५० प्रकल्पांवर स्थगितीची कारवाई करून या प्रकल्पांची बँक खाती गोठविण्यात आली असून, प्रकल्पाशी संबंधित व्यवहारांवरही निर्बंध घालण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काहीही प्रतिसाद न देणाऱ्या आणखी ३४९९ प्रकल्पांवर देखील कारवाईची प्रक्रिया सुरु करुन त्यांना देखील कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्थगित केलेल्या प्रकल्पांतर्गत ज्या नागरिकांनी घर खरेदी केले आहे त्यांची फसवणूक झाली असून घर खरेदीदारांच्या हितांचे रक्षण व्हावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महारेराने दिनांक १९/०१/२०२५ पर्यंत १०,७७३ प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असून, त्याव्दारे विकासकांनी ३० दिवसांत प्रकल्प पूर्ण करण्याबाबत मुदत वाढीचा अर्ज किंवा भोगवटा प्रमाणपत्र महारेराकडे सादर करावे, अन्यथा महारेरा संकेत स्थळावर प्रकल्प तात्पुरती स्थगित (Abeyance) करणे, बँक खाती गोठविणे व प्रकल्पांशी संबंधित व्यवहारांवरही निर्बंध आणणे इत्यादी कारवाई बाबत नोटीस बजाविण्यात आलेली आहे. सदर १०,७७३ प्रकल्पांपैकी १९५० प्रकल्पांचे बँक खाते गोठविण्यात आले होते. त्यापैकी १०६ विकासकांनी प्रकल्पांचा वेळ वाढवून घेणे किंवा प्रकल्पांचे भोगवटा प्रमाणपत्र दिल्याने त्यांच्यावरची प्रकल्प स्थगितीची (Abeyance) कारवाई मागे घेण्यात आली आहे. नोटीसा दिलेल्या १०,७७३ प्रकल्पांपैकी उर्वरित ८,८२३ प्रकल्पांच्या छाननीची कार्यवाही सुरु आहे.
(३) महारेरा कायद्यानुसार, विकासकाने प्रकल्पाचा निधी ७०:३० टक्के या प्रमाणात बँक खात्यात जमा करणे बंधनकारक आहे. ज्या विकासकाने याबाबत कार्यवाही केलेली नाही, अशा विकासकांच्या प्रकल्पांची बँक खाती गोठविण्याची कार्यवाही महारेराकडून करण्यात येते. तसेच प्रकल्पाशी संबंधित व्यवहारांवर निर्बंध घालण्यात येत आहेत. अशा प्रकल्पांत ज्या नागरीकांनी घरे खरेदी केलेली आहेत व घर खरेदीसाठी विकासकाच्या बँकेत पैसे जमा केले आहेत, त्या बँक खात्यातील शिल्लक रक्कमांचा विकासकाला इतरत्र कोठेही वापर करता येऊ नये म्हणून बँक खाती गोठविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच व्यवहारांवर निर्बंध घालण्यात आल्यामुळे नवीन घरखरेदीदार या प्रकल्पांत गुंतवणूक करू शकणार नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील गारगाई धरण प्रकल्पाच्या कामास निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(३६) * १९०३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराची पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने महत्वाचा असलेल्या गारगाई धरण प्रकल्पाचे (ता.वाडा, जि.पालघर) काम जलदगतीने पूर्ण करण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर प्रकल्पास वन विभागाची तसेच वन्यजीव मंडळाची परवानगी वगळता अन्य सर्व विभागांच्या परवानग्या प्राप्त झाल्या असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभाग व वन्यजीव मंडळ यांनी या प्रकल्पाच्या कामास अद्याप परवानगी न देण्याची कारणे काय आहेत तसेच सदरहू प्रकरणी संबंधित वन विभाग व वन्यजीव मंडळाच्या शंका, प्रश्न यांचे सुयोग्य पध्दतीने निरसन करून प्रकल्प तातडीने पुढे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, गारगाई धरणासाठी किती निधीची आवश्यकता आहे त्यानुषंगाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तरतूद करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदरहू धरणाचे प्रत्यक्ष काम सुरु करण्याकरीता आवश्यक असलेली वन्य क्षेत्र आणि वन्यजीव विभागाची परवानगी तसेच प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

गारगाई धरण प्रकल्पासाठी (ता.वाडा, जि.पालघर) वन विभाग, वन्यजीव मंडळ तसेच, केंद्रीय संकल्पचित्रे संघटना, नाशिक व्यतिरिक्त सर्व विभागांच्या परवानग्या प्राप्त झाल्या आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने वन (संवर्धन) कायदा, १९८० व राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची परवानगी प्राप्त करुन घेण्याकरीता प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावाची ठाणे वन्यजीव विभागाकडून तपासणी करण्यात आली. यामध्ये मागणी करण्यात आलेल्या जागेबाबत, बुडीत क्षेत्राबाबत पुनर्वसन व इतर विविध मुद्दे उपस्थित करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेस त्रुटींची पुर्तता करण्याबाबत सूचित करण्यात आले. या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाद्वारे त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. ठाणे वन्यजीव विभागाकडून वेळोवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेस परिपूर्ण सुधारित व अचूक प्रस्ताव सादर करण्याकरीता समन्वय साधण्यात येवून आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(३) महानगरपालिकेने स्वीकृत केलेल्या २०२० मधील ठरावानुसार गारगाई धरण प्रकल्पाचा अंदाजित खर्च रुपये ३१०५ कोटी इतका आहे. तथापि, आवश्यक परवानग्या प्राप्त नसल्याने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये याबाबत तरतूद करण्यात आली नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ठाणे वन्यजीव विभागाकडून उपस्थित त्रुटींची पुर्तता करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरु आहे. याकरीता, ठाणे वन्यजीव विभागाकडून वेळोवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेस परिपूर्ण सुधारित व अचूक प्रस्ताव सादर करण्यासाठी समन्वय साधण्यात येवून आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या तत्कालीन आयुक्तांनी प्रशासकीय अधिकाराचा गैरवापर केल्याबाबत

**(३७) * १४५९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त तथा प्रशासक यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये "आग सुरक्षा राखीव निधी आणि निवृत्तीवेतन राखीव निधीतून" शासनाची पूर्व मंजुरी न घेता रुपये ६० कोटी एवढी रक्कम अन्य कामासाठी वळविली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन प्रशासकाने आपल्या अधिकाराचा गैरवापर केला असून सदर प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी तेथील लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग व महानगरपालिका प्रशासन यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे वारंवार केली असून शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रार निवेदनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कोव्हीड-१९ नियंत्रणात आणण्यासाठी केलेला खर्च, शहरी गरीबांना मूलभूत सेवा (BSUP) योजना पूर्ण करण्यासाठी केलेला खर्च व काही तातडीची विकास कामे करण्यासाठी केलेला खर्च भागविण्यासाठी अग्निशमन दलाचा निधी प्रतीपूर्ती अधीन वापरण्यात आलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे.

तातडीची बाब म्हणून केलेला उक्त खर्च आवश्यक तेवढा निधी उपलब्ध झाल्यानंतर अग्निशमन निधीमध्ये वर्ग करण्यात यावा, असा प्रशासकीय ठराव पारीत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकांतर्गत जमा महसूल मधून आतापर्यंत रुपये ५ कोटी आग सुरक्षा निधी खात्यावर वर्ग करण्यात आलेला आहे. महानगरपालिकेस जसा जसा महसूल प्राप्त होईल. त्यानुसार टप्याटप्याने निधी वर्ग करण्यात येणार आहे.

(२) अशा आशयाची निवेदने लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त झालेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

सदरच्या निधीची प्रतीपूर्ती करण्यात येणार असल्याने यामध्ये कोणताही गैरव्यवहार अथवा अधिकाराचा गैरवापर झाला, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी केलेल्या कारवाईबाबत

**(३८) * ११४८ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाने पुणे जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल ते डिसेंबर, २०२४ या नऊ महिन्यांच्या कालावधीत साडेचार हजार कारवाया करून चार हजार संशयितांना अटक केली तसेच रुपये २१ कोटी एवढया रकमेचा मुद्देमाल जप्त केला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यामध्ये माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये झालेल्या विक्रीपेक्षा सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अवैध दारू निर्मिती, वाहतूक आणि विक्रीवर आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग, पुणे यांनी घातलेल्या धडक मोहिमेमुळे मद्यविक्री मध्ये घट झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभागाने पुणे जिल्ह्यामध्ये केलेल्या कारवाईमध्ये विभागातच कार्यरत असलेले अधिकारी अवैधरित्या विक्री करणाऱ्या दुकानदारांशी संगनमत करुन अवैध मद्यविक्री करित असल्याची बाब निदर्शनास आली असून सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत अवैध मद्य विरोधी केलेल्या कारवायांतर्गत दिनांक ०१ एप्रिल २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत ४४०२ गुन्हे नोंदवून ४१५२ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण रुपये २०,९२,६५,०४०/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) विभागाच्या अधिकाऱ्यांचे अवैध व्यवसायिकांशी संगनमत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.